# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांक:28.07.2024** **वारःरविवार**

---

**ठळक बातम्या,**

- राष्ट्रपतींकडून विविध राज्यांत नव्या राज्यपालांची नियुक्ती, सी. पी. राधाकृष्णन महाराष्ट्राचे नवे राज्यपाल
- पंतप्रधान नरेंद्र मोदी आज करणार मन की बात.
- जागतिक वारसा यादीत 25 नवीन ऐतिहासिक स्थळे समाविष्ट; आसामच्या मोईदम्स स्थळांचा समावेश.
- दिल्लीत शिकवणी वर्गाच्या तळघरात पावसाचं पाणी घुसून तीन विद्यार्थ्यांचा मृत्यू
- महिलांच्या आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत आणि पुरुषांच्या वीस षटकांच्या स्पर्धेत भारतीय संघाचा श्रीलंका विरुद्ध सामना.

**राज्यपाल**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी विविध राज्यांमध्ये नवीन राज्यपालांची नियुक्ती केली आहे. सध्याचे झारखंडचे राज्यपाल सी. पी.राधाकृष्णन यांची महाराष्ट्राच्या राज्यपाल पदी नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र विधानसभेचे माजी अध्यक्ष हरि भाऊ बागडे यांची राजस्थानच्या राज्यपाल पदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्रिपुराचे माजी उपमुख्यमंत्री जिष्णू देव वर्मा यांची तेलंगणच्या राज्यपाल पदी , राजस्थानचे माजी राज्यसभा खासदार ओमप्रकाश माथुर यांची सिक्कीम , माजी केंद्रीय मंत्री संतोष कुमार गंगवार यांची झारखंड , आसामचे माजी लोकसभा खासदार रामेन डेका यांची छत्तीसगडच्या , कर्नाटकचे माजी मंत्री सी एच विजय शंकर यांची मेघालय राज्यपाल पदी नियुक्ती करण्यात आली आहे. सध्या आसामचे राज्यपाल असलेले गुलाब चंद कटारिया यांची पंजाबचे राज्यपाल आणि केंद्रशासित प्रदेश चंदीगड चे प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. लक्ष्मण प्रसाद आचार्य यांची आसामबरोबरच मणिपूरच्या राज्यपाल पदी नियुक्ती करण्यात आली. तर माजी आयएएस अधिकारी के. कैलाशनाथ यांची पुद्दूचेरी नायब राज्यपाल पदी नियुक्ती करण्यात आली आहे.

**विकसित भारत**

विकसित भारत – 2047 हे प्रत्येक भारतीयचं ध्येय असून ते साध्य करण्यासाठी राज्य सरकारं जन सहभाग वाढवून महत्त्वाची भूमिका पार पाडू शकतात, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते काल नवी दिल्ली इथं आयोजित नीती आयोगाच्या नियामक परिषदेच्या नवव्या बैठकीमध्ये बोलत होते. विकसित भारताचे लक्ष्य साध्य करण्यासाठी राज्यं सक्रिय भूमिका बजावू शकतात असं ठाम प्रतिपादन पंतप्रधानांनी या बैठकीत केलं असल्याचं नीती आयोगाचे सीइओ बी व्ही आर सुब्रमण्यम यांनी बैठकीनंतर माध्यमांना माहिती देताना सांगितलं. परकीय गुंतवणूकीचे लाभ सर्व राज्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी राज्यांनी या गुंतवणुकीसाठी स्पर्धा करावी असंही मोदी यांनी म्हणल्याचं सुब्रमण्यम यांनी यावेळी दिली. पंतप्रधान म्हणाले की, हे दशक तांत्रिक आणि भू-राजकीय बदलांचे तसच संधींचादेखील असून, भारतानं या संधींचा लाभ घेत आंतरराष्ट्रीय गुंतवणुकीसाठी धोरणं अनुकूल केली पाहिजेत. देश योग्य दिशेने वाटचाल करत असून शंभर वर्षात एकदा आलेल्या महामारीचा आपण पराभव केला असल्याचं मोदी यांनी म्हटलं आहे. भारत हा तरुणांचा देश आहे आणि तो संपूर्ण जगासाठी एक मोठा आकर्षण आहे. युवकांना कुशल आणि रोजगार क्षम कर्मचारी बनवण्याचा उद्देश असून, नीती आयोगानं आयोजित केलेल्या आकांक्षीत जिल्हा कार्यक्रमाचं पंतप्रधानांनी कौतुक केले. राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांचे मुख्यमंत्री आणि नायब राज्यपाल, पदसिद्ध सदस्य विशेष निमंत्रित म्हणून केंद्रीय मंत्री, उपाध्यक्ष, सुमन बेरी आणि नीती आयोगाचे सदस्य या बैठकीला उपस्थित होते. या वर्षीच्या सभेची संकल्पना विकसित भारत – 2047 अशी असून भारताला विकसित राष्ट्र बनविण्याचं उद्दीष्ट ठेवण्यात आलं आहे.

**BJP CM MEET**

नवी दिल्लीतील भाजपाच्या मुख्यालयात भाजप शासित राज्यांच्या मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांच्या दोन दिवसीय बैठकीला सुरूवात झाली. पंतप्रधान नरेंद्र मोदी, भाजपचे प्रमुख जेपी नड्डा, गृहमंत्री अमित शहा आणि भाजपचे इतर वरिष्ठ नेते या बैठकीला उपस्थित होते. या बैठकीत मोदी यांनी अनेक मुद्द्यांवर मुख्यमंत्री आणि उप मुख्यमंत्र्यांशी चर्चा केली. ही बैठक नियमित अंतरानं आयोजित करून केंद्र सरकारच्या राज्यांमधील महत्त्वाच्या योजनांचा आणि कल्याणकारी उपक्रमांचा आढावा घेतला जातो.

**मन की बात**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सकाळी 11 वाजता 'मन की बात' या कार्यक्रमाद्वारे देशवासियांशी संवाद साधणार आहेत. या कार्यक्रमाचा हा 112 वा भाग आहे. हा कार्यक्रम आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व केंद्रांवरून, तसंच न्यूज ऑन एआयआर या संकेतस्थळ आणि न्यूज ऑन ए आय आर या मोबाइल ॲपवरून थेट प्रसारित केला जाईल.

**लोक-अदालत**

सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी 29 जुलै ते 3 ऑगस्ट या कालावधीत होणाऱ्या आगामी विशेष लोक अदालती सप्ताहात सहभागी होण्यासाठी नागरिकांना आमंत्रित केले आहे. आकाशवाणीला विशेष माहिती देताना न्यायमूर्ती सूर्यकांत म्हणाले की, वैवाहिक आणि मालमत्तेचे वाद, मोटार अपघाताचे दावे, भूसंपादन भरपाई, सेवा आणि कामगार समस्यांसह तडजोडीचे घटक असलेली प्रकरणे यावेळी हाताळली जातील.

**पोलाद उत्पादन**

सरकारी पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या मागणीमुळे 2030 पर्यंत भारतातील पोलाद उत्पादन 300 दशलक्ष टनपेक्षा जास्त जाण्याचा अंदाज आहे अशी माहिती पोलाद सचिव नागेंद्र नाथ सिन्हा यांनी दिली आहे. ते काल नवी दिल्लीतील भारत चेंबर ऑफ कॉमर्सला संबोधित करताना बोलत होते. पोलादाची सध्याची मागणी मोठी असताना सरकारच्या पायाभूत सुविधांच्या जोरावर 10 टक्क्यांच्या वाढीची अपेक्षा असल्याचं सिन्हा यांनी यावेळी सांगितलं. केंद्रीय पोलाद आणि अवजड उद्योग मंत्री एच डी कुमारस्वामी यांनी पोलादाच्या निर्यातीशी संबधित दुसऱ्या पोर्टलचं उद्घाटन केलं. प्रभावी निर्णय आणि भागधारकांच्या धोरणात्मक नियोजनासाठी या पोर्टलचा लाभ होणार आहे.

**व्हेनेझुएला-निवडणूक**

व्हेनेझुएलामध्ये आज अध्यक्षपदासाठी मतदान होणार आहे. विरोधी पक्षांनी एकाच उमेदवाराला पाठिंबा दिल्यामुळे सत्ताधारी युनायटेड सोशालिस्ट पक्षासमोर एक गंभीर आव्हान उभं राहिलं आहे. विद्यमान अध्यक्ष निकोलस मादुरो यांचे मुख्य प्रतिस्पर्धी माजी राजकीय मुत्सद्दी एडमंडो गोन्झालेझ उरुतिया हे आहेत.

**जयशंकर- जपान दौरा**

परराष्ट्र मंत्री डॉक्टर एस जयशंकर दोन दिवसांच्या जपान दौऱ्यावर आहेत. जपानमधील भारताचे राजदूत सी बी जॉर्ज यांनी जयशंकर यांचं आज टोक्यो विमानतळावर स्वागत केलं. जयशंकर यांचे जपानी समकक्ष सुश्री योको कामिकावा यांनी उद्या होणाऱ्या क्वाड परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीत सहभागी होण्यासाठी निमंत्रण दिलं आहे. या बैठकीत भारत, जपान, अमेरिका आणि ऑस्ट्रेलियाचे परराष्ट्र मंत्री सहभागी होत असून, ते हिंद प्रशांत क्षेत्रातील घडामोडींवर विचार विनिमय आणि क्वाड उपक्रमांच्या प्रगतीचा आढावा घेतील. या बैठकीत प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय मुद्द्यांवर चर्चा होणार असून सार्वजनिक वस्तूंच्या वितरणाद्वारा भविष्यातील मुक्त हिंद प्रशांत प्रदेशासंबंधीही चर्चा होईल.

**यूनेस्को**

यूनेस्कोनी या वर्षी जागतिक वारसा यादीत 25 नवीन ऐतिहासिक स्थळांचा समावेश केला आहे तर दोन प्रमुख सीमा सुधारणादेखील केल्या आहेत. नवी दिल्लीतील भारत मंडपम इथं आयोजित 46 व्या जागतिक वारसा समितीच्या सत्रात याची माहिती देण्यात आली. यापैकी, जपानच्या सदो बेट इथल्या सोन्याच्या खाणी, थायलंडची  फु फ्राबट ही ऐतिहासिक बाग,  दक्षिण आफ्रिकेतील नेल्सन मंडेला मानवी हक्क, मुक्ती आणि सलोखा वारसा स्थळ, इटलीचे व्हाया ॲपिया आणि चीनचे बीजिंग सेंट्रल एक्सिस यासह 13 नवीन स्थळांवरही शिक्कामोर्तब करण्यात आलं. यापैकी 19 स्थळे सांस्कृतिक वारसा स्थळे म्हणून समाविष्ट करण्यात आली आहेत, तर 4 नैसर्गिक श्रेणीत आणि 2 मिश्र श्रेणीत समाविष्ट करण्यात आली आहेत. 43 वे जागतिक वारसा स्थळ म्हणून भारतातील आसाममधील अहोम घराण्याची 700 वर्षे जुनी मंड-दफन पद्धत असलेल्या मोइदाम्सचा समावेश करण्यात आला.

**दिल्ली दुर्घटना**

दिल्लीतील जुन्या राजेंद्र नगरमधील शिकवणी वर्गातील तळघरात मुसळधार पावसामुळे पाणी शिरल्यानं तीन विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला. अडकलेल्या काही विद्यार्थ्यांची सुटका करण्यात आली असून तिघांवर उपचार सुरू आहेत अशी माहिती पोलिसानी दिली आहे. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून, आतापर्यंत दोघांना ताब्यात घेण्यात आलं आहे. दिल्ली भाजपचे प्रमुख वीरेंद्र सचदेवा यांनी आप सरकारवर टीका करत दिल्ली महानगरपालिकेतील भ्रष्टाचाराची चौकशी करण्याची मागणी केली आहे.

**पॅरिस ऑलिम्पिक**

पॅरिस 2024 ऑलिम्पिकमध्ये भारताच्या बॅडमिंटन मोहिमेची सुरुवात चिराग शेट्टी, सात्विक साईराज रँकीरेड्डी आणि लक्ष्य सेन यांनी  आपआपल्या गटात विजय प्राप्त केले आहेत. काल भारताच्या दुसऱ्या सामन्यात चिराग शेट्टी आणि सात्विक साईराज रँकीरेड्डी जोडीनं फ्रान्सच्या लुकास कॉर्व्ही आणि रोनन लाबर यांचा 21-17, 21-14 असा पराभव केला. मुष्टियुद्ध प्रकारात महिलांच्या 54 किलो वजनी गटात भारताच्या प्रीती पवारनं उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. तिने व्हिएतनामच्या वो थी किम आन्ह हिचा 5-0 असा पराभव केला. तिची पुढील लढत कोलंबियाच्या द्वितीय मानांकित येनी एरियासशी होणार आहे.

**क्रिकेट**

भारत आणि श्रीलंका यांच्यात तीन सामन्यांच्या मालिकेतील काल झालेल्या पुरुषांच्या पहिल्या 20 षटकांच्या क्रिकेट सामन्यात श्रीलंकेचा 43 धावांनी पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना भारताने 213 धावा केल्या तर प्रत्युत्तरादाखल श्रीलंका संघ 170 धावा करू शकला. सूर्य कुमार यादव याला

सामनावीर पुरस्काराने गौरवण्यात आले. मालिकेतील पुढील सामना आज होणार आहे. दरम्यान महिलांच्या आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत भारत आणि श्रीलंका संघात विजेतेपदासाठी आज श्री लंकेतल्या दंबुला इथं लढत होणार आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.**